**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६१५ / पुणे | श्री. शंकर विठ्ठल सोंडेकर स.नं.३७/२, रामनगर, वडगांव शेरी, पुणे | सह व्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., पुणे-३७ | व्यवस्थापक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., पुणे-३७ | डी केस १३४६ / ०६/०७ बाबत कार्यवाही झाली नाही, याबाबत माहिती | अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती देण्यात आली आहे. कार्यवाही वा खुलासा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | २५२५ / पुणे | श्री. अनंत देऊ गावडे स.नं.१४, वीरभद्र नगर, प्रेमप्रभा, बाणेर, पुणे-४५ | माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (विकास योजना), पुणे महानगर-पालिका, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ | अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता (विकास योजना ), पुणे महानगर पालिका, शिवाजी नगर, पुणे-४११ ००५ | मौजे लोहगांव येथील जो भाग पुणे महानगर-पालिकेत समाविष्ट करण्यात आला व नंतर वगळण्यात आला, त्याबाबतची अधिसूचना | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | १५३१/ पुणे | श्री. शरद रामण्णा शेट्टी फ्लॅट नं.१४, वीरभद्रनगर, प्रेमप्रभा, बाणेर, पुणे-४५ | जन माहिती अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग, ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई | श्री. सुभाष भगवान हनुवते (दुय्यम निरीक्षक) यांच्या सेवा विषयक व मालमत्तेबाबत माहिती | अपीलकर्त्यास उर्वरित वेतना बाबत माहिती दोन दिवसांत देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १३९६ / पुणे | श्री. राजेंद्र सतोबा कोंडे मु.पो.खेड-शिवापूर बाग, हॉटेल विशाल शेजारी, ता.हवेली, जि. पुणे | मंडल कृषि अधिकारी, कृषि महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-५ | तालुका कृषि अधिकारी, कृषि महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-५ | सन २००६ ते जून २००७ या कालावधीत हवेली तालुक्यातील तपासणी अधिकाऱ्यांच्या झालेल्या कामाच्या प्रतिक्रियाबाबत माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्यांने दि.१४.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. |
| ५ | १३१७ पुणे | श्री. यादव गणपतराव कांबळे स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व ज्यू कॉलेज, दापोडी, पुणे-१२ | प्राचार्य, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व ज्यू कॉलेज, दापोडी, पुणे-१२ | अध्यक्ष /सचिव स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व ज्यू कॉलेज, दापोडी, पुणे-१२ | सन २००१ ते २००७ या कालावधीतील पगार बिलांच्या खर्चाच्या प्रती, शाळा समितीच्या सभेचे इतिवृत्त व प्रा.प्रदिप कबाडे यांच्या अनुषंगाने माहिती | आवश्यक ते शुल्क भरल्या-नंतर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ५ अपिले (क्र. १६१५, २५२५, १५३१, १३९६, १३१७ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १५३१ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी पूर्तता करून अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि.२६.३.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सूर्यकांत रामचंद्र सैद — अपीलकर्ता
द्वारा सौ. सुनंदा विजय काळे
जनता विद्यामंदिर विद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी
पंचायत समिती, घोडेगाव. ता.आंबेगाव. जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, गिरवली, ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४५ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीचा दिनांक | १२.३.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. सूर्यकांत रामचंद्र सैद<br>द्वारा सौ. सुनंदा विजय काळे, जनता विद्यामंदिर विद्यालय,<br>घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत, गिरवली, ता.आंबेगाव, जि.पुणे<br>श्री. ज्योतीराम श्रीरंग बोर्डे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे गिरवली, ता. आंबेगाव येथील घर मिळकत क्र.४४९ व ४५० ह्या श्री. नामदेव बाजाबा सैद यांचे नावे ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये नोंद ज्या कागदपत्रांच्या आधारे केली, त्याबाबतच्या सर्व कागदपत्रांच्या नकला | |

## विवेचन

एकत्र कुटुंबातील मिळकतीच्या मालकी बाबतच्या मूळ नोंदीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे वारंवार मागूनही मिळत नसल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. सूर्यकांत रामचंद्र सैद यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २५.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभयतांमध्ये माहितीबाबत एकमत न झाल्याने सुनावणी ठेवण्यात आली.

सन १९६८ पासून आपल्या वडिलांच्या नावे असलेली मिळकत ग्रामसेवकाशी संगनमताने आपल्या चुलत्यांनी स्वतःच्या नावे करून घेतली. या फेरफाराबाबतची कोणतीही माहिती आपल्याला देण्यात येत नाही. ग्रामपंचायतीचे अभिलेख उपलब्ध नसल्याचे उत्तर दिले जाते. परंतु मूळ मालकांची संमती नसताना मिळकतीला अन्य व्यक्तीचे नाव कसे नोंदविले गेले व वारसदार / हिस्सेदार असूनही आपली नावे नोंदविली नाहीत, ती नोंदविली गेली पाहिजेत, असे प्रतिपादन श्री. सैद यांनी विविध कागदपत्रांमध्ये लेखी व आयोगापुढील सुनावणीत तोंडी केले. १५ वर्षांच्या काळातील घरपट्टी आपण भरली आहे, असे श्री. सैद यांनी स्पष्ट केले. 'ग्रामपंचायत गिरवली, ता. आंबेगाव येथील सन १९६८ ते १९८५ या काळातील अभिलेख गहाळ आहेत. श्री. दामोदर एकनाथ थोरात हे सन १९७४ ते १९८७ या कालावधीत ग्रामपंचायत, गिरवली येथे ग्रामसेवक असतानाचे हे कागदपत्र गहाळ आहेत. त्याबाबतची माहिती तत्कालीन ग्रामसेवक श्री. एम.एम.चिखले यांनी अपीलकर्त्यास दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गिरवली श्री. ज्योतीराम श्रीरंग बोर्डे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते. आपल्या कालावधीतील संपूर्ण कागदपत्रे आपण कार्यभार हस्तांतरणाच्या वेळी दिली असून सन १९८६-८७ मध्ये संबंधित मिळकतीची फेरआकारणी केली, असे श्री. थोरात यांनी गट विकास अधिकारी, आंबेगाव यांना दि. २८.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या पत्रावरून दिसते.

'स्थानिक चौकशी प्रमाणे विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत, गिरवली यांनी ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन दप्तर १० वर्षांपासून गहाळ झाल्याची खात्री केली आहे व त्याबाबत या

स्तरावरून चौकशी करण्यात येत आहे. सर्व चौकशी पूर्ण झाल्यानंतर तुमच्या अर्जाबाबत कायदेशीर निर्णय घेऊन तुम्हांस कळविण्यात येईल,' असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, आंबेगाव यांनी दि. २३.११.२००७ रोजी प्रथम अपिलावरील आदेशात म्हटले आहे, तर 'ग्रामपंचायत दप्तरासंबंधात संबंधित पर्यवेक्षिय अधिकारी यांना माहिती घेऊन कारवाई करण्याबाबत दि. ४.१०.२००८ रोजी कळविण्यात आले आहे,' असे विस्तार अधिकारी श्री. एस.डी. सोनवणे यांनी दि. २५.११.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. 'चौकशी चालू आहे' एवढेच वर्षानुवर्षे कळविले जात आहे. प्रत्यक्ष कोणतीच कारवाई केलेली दिसत नाही.

मिळकतीला केलेल्या नोंदी योग्य की अयोग्य, हा माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र ग्रामपंचायतीचे १५ वर्षांच्या काळातील सर्व अभिलेख गहाळ होते व त्याबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही, हे आक्षेपार्ह आहे. कायम स्वरूपी जतन करण्याच्या कागदपत्रांसह सर्व प्रकारच्या कागदपत्रांचा त्यात समावेश आहे. असे दस्तऐवज हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणे आवश्यक असलेल्या अभिलेखाचा भाग आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख कायदा २००५ अन्वये जतनाच्या कालावधीनुसार अभिलेख आढळत नसतील तर संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्याविरूध्द फौजदारी गुन्हा नोंदवावा, अशी तरतूद आहे. अशा प्रकारची कोणतीही ठोस कारवाई ग्रामपंचायतीपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत केली गेली नाही, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरून स्पष्ट होते. याबाबत त्या कालावधीत कार्यरत असणारे ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर कारवाई करावी, असे अपीलकर्त्याने 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्याची ही मागणी रास्त आहे.

ग्रामपंचायत, गिरवली येथील सन १९६९-७० ते १९८५-८६ या कालावधीतील दप्तर गहाळ झाले आहे. ही बाब गंभीर असून त्याबाबत त्वरित पूर्ण चौकशी करून अभिलेख गहाळ होण्यास जबाबदार असणाऱ्यांविरूध्द कडक कारवाई केली गेली पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची ही जबाबदारी राहील.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. ग्रामपंचायत, गिरवली, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील सन १९६९-७० ते १९८५-८६ या कालावधीतील अभिलेख गहाळ होण्यासंदर्भात चौकशी करून, तसेच संबंधितांविरूध्द कारवाई करून व अभिलेख उपलब्ध होण्याबाबत उपाययोजना करून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पुणे यांनी दि.२५.५.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

पुणे
दि. २६.३.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | १६५७ / पुणे | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री. रवींद्र दिगंबर चौधरी<br>५-अ, तुलसी विहार, स.नं.१२३/१,<br>बाणेर म्हाळुंगे रोड, बाणेर (पश्चिम), पुणे-४५ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, मुख्य इमारत, ३रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, मुख्य इमारत, ३रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-१ | गैरहजर |

श्रीमती अनिता शरद पाटील, द्वारा श्री. शरद पुंडलिक पाटील, विवेकानंद कॉलनी, अमरावती यांनी सन २००१ ते २००५ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेला बसण्यासाठी केलेला अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यांच्या प्रती अपीलकर्ता डॉ. रवींद्र दिगंबर चौधरी यांनी मागितल्या होत्या.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने डॉ. चौधरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये माहितीमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्रीमती अनिता शरद पाटील यांचा आपल्या मुलाशी - श्री. संजीव रवींद्र चौधरी यांच्याशी सन १९९१ साली विवाह झाला होता, असे नमूद करून अपीलकर्ता श्री. चौधरी यांनी त्या अनुषंगाने विस्तृत निवेदन आयोगाला सादर केले आहे. श्रीमती चौधरी या सध्या डी.वाय.एस.पी. या पदावर कार्यरत असल्याचे व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे केलेल्या अर्जात त्यांनी खोटी माहिती पुरविल्याचे श्री. चौधरी यांनी म्हटले आहे. त्यांच्या वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांची आयोगाने दखल घेण्याचे कारण नाही. मागितलेली माहिती लक्षात घेता राज्य माहिती आयोगाच्या निर्देशानुसार त्रयस्थ पक्ष म्हणून श्रीमती पाटील यांचे म्हणणे जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी मागविले होते. आपली माहिती देऊ नये, असे श्रीमती पाटील यांनी कळविले. माहिती नाकारण्याबाबतचा तसा उल्लेख

जन माहिती अधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात केला आहे. अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, मुख्य इमारत, ३रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे ही माहिती कोणत्याही सार्वजनिक हिताशी संबंधित नाही, ही वस्तुस्थिती उपलब्ध कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही व्यक्तिगत स्वरूपाची म्हणता येणार नाही. मागणीला वैयक्तिक संदर्भ असला, तरी सार्वजनिक पदाच्या व संबंधित निवडप्रक्रियेच्या अनुषंगाने सादर केल्या जाणाऱ्या कागदपत्रांची माहिती अपीलकर्त्याने मागितली आहे, व तेवढीच दिली जाणे योग्य आहे. 'अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे' असा ढोबळ उल्लेख अपीलकर्त्याच्या अर्जात आहे. तसेच मूळ अर्जात मागितलेल्या माहितीचा विस्तार प्रथम व द्वितीय अपिलात केला आहे. तो विचारात घेण्याचे कारण नाही. तसेच छायांकित प्रती देऊन त्या अधिकृत असल्याचे पत्र देणे पुरेसे आहे. या व्यतिरिक्तची माहिती व सत्य प्रतीवरून सत्य प्रती देण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य.

२. श्रीमती अनिता शरद पाटील यांनी लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी भरलेला अर्ज, निवड झालेली शाखा व पद हा तपशील व त्यांच्या त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास द्याव्यात. या व्यतिरिक्तच्या माहितीची मागणी अमान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई श्री. आर.बी. खोत यांनी याबाबतचा पूर्तता अहवाल दि. २०.४.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. २५.३.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत श्रीरंग शेडगे
सी-५७, सिध्दी हौ.सो.कर्वेनगर, पुणे-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, देवव्रत सह.गृहनिर्माण संस्था मर्या.
नाशिक, ता.जि.नाशिक — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, देवव्रत सह.गृहनिर्माण संस्था मर्या.
नाशिक, ता.जि.नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७४ / |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंद्रकांत श्रीरंग शेडगे
सी-५७, सिध्दी हौ.सो.कर्वेनगर, पुणे-५२

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>देवव्रत सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नाशिक, ता.जि.नाशिक संस्थेकडून गट विमा योजनेअंतर्गत गृहकर्जासाठी वाटप करण्यात येणारा निधी कोणाकडून प्राप्त होतो. श्री.ए.व्ही.विसपुते व श्रीमती चारुशिला विसपुते, श्री.म्हात्रे हे सभासद असल्यास गृहकर्ज मंजुरीच्या पत्राची प्रत, मूळ वेतन दाखले, ताबा दिल्याचा दाखला, वसुली सुरु करण्यासाठी दिलेले पत्र, सेवा पुस्तकात नोंदी घेतल्या असल्यास प्रत, वसुली सुरु झाली नसल्यास लेखा परीक्षणात ही बाब लक्षात आणून दिली आहे काय, लेखापरीक्षण अहवाल मिळावा, सभासद थकित असल्यास संस्थेने काय कारवाई केली आहे, |

## विवेचन

राज्य शासनाच्या गट विमा योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या घरबांधणी कर्जाच्या अनुषंगाने सभासदांच्या कर्जमंजुरीबाबतची व वसुलीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.चंद्रकांत श्रीरंग शेडगे यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, देवव्रत सह.गृहनिर्माण संस्था मर्यादित, ता.जि.नाशिक याच्याकडे मागितली होती. ती अपुरी मिळाल्याच्या कारणावरुन श्री.शेडगे यांनी संस्थेचे अपिलीय प्राधिकारी म्हणून अध्यक्ष, देवव्रत सह.गृहनिर्माण संस्था मर्यादित, ता.जि.नाशिक यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही, या कारणावरुन श्री.शेडगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२६.११.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले. मुद्दा क्र.९,१२,१४,१६ व १७ यांची माहिती मिळाली नसल्याचे श्री.शेडगे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रापत्रात नमूद केले.

सभासदांनी कर्जमंजुरीसाठी दिलेली कागदपत्रे संस्थेने कर्जमंजुरीसाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर केलेली आहेत. कर्जवसुली संदर्भात संस्थेने वेळोवेळी संबंधित कार्यालयास पत्रव्यवहार केलेला आहे. कर्जाची वसुली व त्याबाबतचा तपशील त्या कार्यालयाकडे मिळेल, असे संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी श्री.शेडगे यांना कळविले आहे.

मात्र कर्ज नोंदीचा अनुपालन अहवाल संस्थेनेच सहकार खात्यास पाठवावयाचा असतो. वसुली प्रक्रिया योग्यप्रकारे सुरु न केल्यामुळे जवळपास ४३ महिने वसुली झाली नाही, परिणामी शासकीय निधीचा योग्य वापर झालेला नाही असे श्री.शेडगे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. हा तपशील लक्षात घेता श्री.शेडगे यांनी मागितलेली माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक आहे. संस्थेच्या अध्यक्षांनी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन अथवा श्री.शेडगे याना त्यांच्यामार्फत पुरविण्याची व्यवस्था करुन ही जबाबदारी पार पाडली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा सचिव, देवव्रत सहकारी गृहनिर्माण संस्था, ता.व जि.नाशिक यांनी मूळ अर्जानुसार माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्ता श्री.चंद्रकांत श्रीरंग शेडगे यांना १५ दिवसात द्यावी व आयोगाला पूर्तता अहवाल सादर करावा. यानुसार कार्यवाही न झाल्यास जन माहिती अधिकारी कारवाईस पात्र ठरतील.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२५.०२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०५१ | श्री. पंडित भिमराव जगताप ५४८, कृष्णकुंज निवास, पारिजात सोसायटी, हडपसर, पुणे -२८ | व्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्य सहकारी बँक मर्या., सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | आकुलगाव विविध कार्यकारी सेवा सह.संस्था माढा यांच्या कर्ज प्रकरणाच्या अनुषंगाने एकूण ६ मुद्यांची माहिती |
| २ | २०५१-अ | श्री. पंडित भिमराव जगताप ५४८, कृष्णकुंज निवास, पारिजात सोसायटी, हडपसर, पुणे -२८ | व्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्य सहकारी बँक मर्या., सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | अपीलकर्त्यांच्या स्वत:च्या कर्ज प्रकरणाच्या संपूर्ण फेर प्रकरणी जमा पावत्या व खर्चाच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती |
| ३ | २६६३ | श्री. पंडित भिमराव जगताप ५४८, कृष्णकुंज निवास, पारिजात सोसायटी, हडपसर, पुणे -२८ | सचिव, आकुलगाव विविध कार्यकारी सह संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर | कर्जवाटप व कर्ज परतफेड संबंधात एकूण ०७ मुद्यांची माहिती |
| ४ | २६६४ | श्री. पंडित भिमराव जगताप ५४८, कृष्णकुंज निवास, पारिजात सोसायटी, हडपसर, पुणे -२८ | सचिव, आकुलगाव विविध कार्यकारी सह संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर | कर्ज प्रकरण, जमा रक्कम, मुद्दल, व्याज बोजा उतरविणे बाबत एकूण १६ मुद्यांची माहिती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २६८० | श्री. पंडित भिमराव जगताप ५४८, कृष्णकुंज निवास, पारिजात सोसायटी, हडपसर, पुणे -२८ | सचिव, आकुलगाव विविध कार्यकारी सह संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर | सोसयटीमध्ये जमा रक्कमा, कर्जस्वरुपात काढलेली रक्कम, पावत्या व चेकने काढलेल्या रक्कमा याबाबत साक्षांकित प्रती मिळणेबाबत |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले. प्राप्त माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (क्रमांक २०५१, २०५१-अ, २६६३, २६६४ व २६८०) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : ०४.०३.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२९.०१.२००९ व २४.०२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०५४ | श्री.प्रशांत रामचंद्र खोल्लम बोरी बु., ता.जुन्नर, जि.पुणे -११ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, बोरी बु., ता.जुन्नर, जि.पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मु.पो.ता.जुन्नर, जि.पुणे | सन २००६-०७ या कालावधीतील जमा खर्चाची माहिती, वैयक्तिक शौचालय धारकांची यादी इ. एकूण ७ मुद्यांची माहिती. |
| २ | २०५७ | श्री.हर्षकुमार पो.बम्ब २३१/२, नाना पेठ, पुणे -२ | नगर भूमापन अधिकारी क्र.१, पिंपरी चिंचवड कार्यालय, पुणे | अधिक्षक, भूमी अभिलेख यांचे कार्यालय, पुणे -१ | सिटीएस पत्रकाच्या नोंदीच्या अनुषंगाने माहिती. |
| ३ | २१२२ | श्री.राजेंद्र सुरेश झेंडे मु.पो.पाटस (अंबिकानगर), ता.दौंड, जि.पुणे-१९ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत पाटस, ता.दौंड, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दौंड, ता.दौंड, जि.पुणे | सन २००२ ते २००७ या कालावधीतील दलित निधीची रक्कम व इंदिरा आवास योजनेची माहिती. |
| ४ | २४११ | श्री.रमेश रा.फोंडगे ५४-ब, हनुमान नगर, पुणे -१६ | उप आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे -५ | आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे -५ | पुणे महानगरपालिकेचे माजी आरोग्य प्रमुख डॉ. अ.मो.रावेतकर यांच्या पेन्शनच्या अनुषंगाने माहिती |
| ५ | २४३८ | श्री.विश्वास शिवाजीराव चव्हाण १४७७ कसबा पेठ, लक्ष्मी निवास, पुणे -११ | क्षेत्रिय अधिकारी, कसबा - विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्रमांक ३, पुणे महानगरपालिका, पुणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ व महानगरपालिका सेवा विनिमय १९८५ अन्वये नैमेत्तिक रजेबाबत एकूण ७ मुद्यांची माहिती. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | २६४५ | श्री.गोकुळ त्रिंबक शिंदे<br>लोणी खुर्द,<br>ता.राहाता,<br>जि.अहमदनगर | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग शिरुर, ता.शिरुर, जि. पुणे | अधीक्षक अभियंता , सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांचे कार्यालय, पुणे -१ | शाखा अभियंता या पदाच्या सेवाविषयक बाबी , सीआर आणि एसआर कामाच्या अनुषंगाने एकूण १७ मुद्यांची माहिती |
| ७ | २७४२ | श्री.संभाजी दगडू भंडारे<br>मु.पो.वढु बु.,<br>ता.शिरुर, जि.पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वढु बु.,शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे | दि.१ मे २००६ ते ३१ जुलै २००८ या कालावधीतील लेखापरीक्षण अहवाल, थकबाकीदार कंपनीची संख्या, इ.५ मुद्यांची माहिती |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले. प्राप्त माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील अपिले अनुक्रमांक १ ते ७ (क्रमांक २०५४, २०५७, २१२२, २४११, २४३८, २६४५ व २७४२) निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : ३०.०३.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.आय.एस.मुळगावकर
विक्रीकर उपायुक्त (अ.लो.प.), ००१,
विक्रीकर भवन, दुसरा मजला, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर विक्रीकर आयुक्त,
पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा,पुणे-६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विक्रीकर सहआयुक्त(व्यवसायकर),
पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा,पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६३ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.आय.एस.मुळगावकर
विक्रीकर उपायुक्त (अ.लो.प.), ००१,
विक्रीकर भवन, दुसरा मजला, येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर विक्रीकर आयुक्त,
पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा,पुणे-६
विद्यमान श्री.यशवंत गोपाळा महाले, तत्कालीन-श्री.व्ही.आर.मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा विक्रीकर सहआयुक्त(व्यवसायकर),
पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, तिसरा मजला, येरवडा,पुणे-६
विद्यमान-श्री.स.ज्ञा.भंडारे, तत्कालीन-श्री.राहुल भास्कर गवई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.९.२००७(दोन), ५.१०.२००७(दोन), १५.१०.२००७, १८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.१०.२००७, २०.११.२००७, २०.११.२००७, २९.११.२००७, ३.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.५.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>**पत्र क्र.ब-६०**-दि.१९.९.२००६ च्या विभागीय चौकशी संदर्भात समक्ष हजर राहिल्यानुसार नोटीसवाहक श्री.भिसे यांच्या हस्ताक्षरातील पत्राची प्रमाणित प्रत. श्री.भिसे व सौ.मुळगावकर यांना सुनावणी देऊन जी कार्यवाही पत्रकावर नोंद केली आहे त्याची प्रत,<br>**पत्र क्र.ब-६१**-श्री.एम.डी.साळवी, श्री.आर.सी.गाढवे व री.एम.एम.मामीले या अधिकाऱ्यांचे दि.१.३.२००६ ते १५.३.२००६ या कालावधीचे वेतन न देण्याबाबतचे आदेश दि.२०.३.२००६ रोजी काढले त्या आदेशाची प्रत,<br>**पत्र क्र.ब-६४**-मे.कल्पक लाय व महाराष्ट्र टिंबर ट्रेडिंग कं. या दोन प्रकरणाचा वसुली अहवाल.<br>**पत्र क्र.ब-६५**-दि.१.९.२००३ ते ३१.३.२००४, १.४.२००४ ते ३१.७.२००४, १.८.२००४ ते ३१.३.२००५ व १.७.२००५ ते ३१.१२.२००६ या कालावधीतील गोपनीय अहवालाचे स्वयंमूल्य निर्धारण अहवाल, अतिउत्कृष्ट अभिप्राय मिळणेबाबतचे निकष.<br>**पत्र क्र. ब-७०**-मे.किर्लोस्कर पावर इक्विपमेंट नो. क्र.४११०१४/एस/४३, ४११०१४/एल/४४-सन१९९७-९८ च्या निर्धारणा दि.१.४.२००१ रोजी कालबाह्य-माहिती.<br>**पत्र क्र.ब-७३**- श्री.मोहिते, विक्रीकर निरीक्षक, सौ.मोहिते, विक्रीकर अधिकारी, सौ.परमार,लघुटंकलेखिका सन २००५-२००६ यांच्या गैरवर्तनाबाबत काय कार्यवाही केली? |

## विवेचन

विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर), पुणे क्षेत्र, पुणे यांच्या कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांचे वेतन कपात आदेश व गोपनीय अभिलेख आदिंबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून आपल्याला न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्त्या सौ.आय.एस.मुळगावकर यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निकाली काढले. त्यामुळे व आपल्याला अपेक्षित

माहिती मिळाली नाही, म्हणून सौ.आय.एस.मुळगावकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने आयोजित केलेल्या दि.२१.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता या कार्यक्रमास गैरहजर असल्यामुळे अपील सुनावणीस घेण्यात आले.

आपण सहा मुदयांची मागितली असून ती अत्यंत त्रोटक स्वरुपात दिली आहे व काही मुदयांची माहिती पूर्ण नाकारली आहे, असे प्रतिपादन सौ.मुळगावकर यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. आपल्या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व माहिती सौ.मुळगावकर यांना देण्यात आली. मात्र नोटीसवाहक श्री.भिसे यांचे लेखी निवेदन व काही कर्मचाऱ्यांचे गोपनीय अभिलेख ही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे दिली नाही, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.व्ही.आर.मोरे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.यशवंत गोपाळ महाले यांनी सांगितले. आपण अत्युत्कृष्ट काम केल्यानुसार अभिप्राय न मिळण्याची कारणे व ज्यांना मिळाले त्यांच्याबाबत लावलेले निकष अशा स्वरुपाची खुलासा व भाष्य अपेक्षित असलेली माहिती सौ.मुळगावकर यांनी मागितली आहे. तत्कालीन अधिकाऱ्यांनी लावलेल्या निकषांबाबतची माहिती अभिलेखावर नसल्यामुळे देता येणे शक्य नसते, तसेच ते निकष योग्य की अयोग्य याबाबत आपण माहितीच्या अधिकारात भाष्य करु इच्छित नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त(प्रशासन) व्यवसायकर, पुणे यांनी केले. कालबाह्य प्रकरण- जोडपत्र 'अ' नियम ३ ब-७०, दि.१५.१०.२००७ अन्वये कालबाह्य प्रकरणात अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती आपल्याला मिळाली नाही. ही माहिती गोपनीय नाही असे सौ.मुळगावकर यांनी नमूद केले. दोषी अधिकाऱ्यांवरील कारवाईबाबतचे प्रस्ताव व कालबाह्य प्रकरणांची प्रकरणनिहाय व अधिकारीनिहाय यादी ही माहिती आयुक्त, विक्रीकर, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविलेली असून अशी माहिती आयुक्त कार्यालयाकडूनच मिळू शकेल, असे अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन) व्यवसायकर, पुणे यांनी सांगितले.

नोटीसवाहक श्री.भिसे यांनी हस्ताक्षरात दिलेले निवेदन हे सौ.मुळगावकर यांच्या संदर्भात असून ते त्रयस्थ पक्षाचे आहे, असे म्हणता येणार नाही. अन्य कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाबाबत जन माहिती अधिकारी यांचे निवेदन योग्य आहे, मात्र दोषी अधिकाऱ्यांवर केलेली कारवाई, कालबाह्य प्रकरणांची यादी व त्याबाबतची कारवाई ही माहिती अपीलकर्त्याला मिळाली पाहिजे. सौ.मुळगावकर यांनी मूळ अर्ज केल्याला एक वर्ष होऊन गेले आहे. तांत्रिकदृष्ट्या विहित मुदतीत उत्तर देण्यासारख्या बाबी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पार पाडल्या असल्या तरी एवढ्या कालावधीनंतर आयुक्त, विक्रीकर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून सौ.मुळगावकर यांनी ही माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे म्हणणे योग्य नाही. त्यामुळे वरिष्ठ कार्यालयाकडून ही माहिती प्राप्त करुन देणे ही जन माहिती अधिकारी यांची जबाबदारी आहे. भाष्य, खुलासा याबाबत अपिलीय प्राधिकारी श्री.स.ज्ञा.भंडारे यांनी केलेले निवेदन रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्यावरील कारवाई, कालबाह्य प्रकरणांची यादी व त्या अनुषंगाने केलेली कारवाई ही माहिती अपीलकर्त्यास १५ दिवसात जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर अधिकारी (व्यवसायकर) क्र.६ श्री.यशवंत गोपाळा महाले यांनी द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता, त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर अधिकारी (व्यवसायकर) क्र.६ यांनी दि.१०.४.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. या संपूर्ण कार्यवाहीची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त(प्रशासन) व्यवसायकर, पुणे यांच्यावर राहील.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.३.२००९**

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

(५३)

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दुरध्वनी क्र. ०२० _ २६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२० _ २६०५०६३३

क्रमांक: अपील-२१३०/पुणे
दिनांक : १९.०३.२००९

प्रति,

श्री.प्रमोदानंद उर्फ प्रमोद शंकर थळी
प्रमोदानंद प्रतिष्ठाण, शापारिआं इमारत,
१ ला मजला १४, राजाराम मोहन रॉय मार्ग,
मुंबई -४

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि. ०६.०७.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूर्ण माहिती दिली आहे. आपली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिलेल्या माहितीच्या व्याख्येत बसत नाही, याकारणास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

(सही) १९।०३

( रा. म. गेंगजे )
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

प्रत:

सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग, पुणे -३७ यांना माहितीसाठी

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०_२६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२०_२६०५०६३२

**क्रमांक: अपील-२४६१/पुणे**
दिनांक : १९.०३.२००९

प्रति,

श्री. यशवंत रावजी जगताप
रा.कान्हाटी, ता.बारामती,
जि.पुणे

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि. १३.१०.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता मूळ विषयाचा निर्णय पूर्वीच झाला असल्याने दाखल स्तरावर अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

( रा. म. गेंगजे )
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

प्रत:

१. वरीष्ठ लिपीक, उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बारामती, जि.पुणे यांनी विलंबाबाबत खुलासा करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवून आयोगास अनुपालन अहवाल दि.०५.०४.२००९ अखेर आयोगास सादर करावा.